# रे.दि.मु.क्र.८/२०१५ मधील
# नि.२३ वरील आदेश

(सचिन आवटे वगैरे विरुध्द कांतीलाल पटेल)

(१) वादींनी प्रस्तुत अर्ज जमीन मिळकत गट नं.४२६ ची कोर्ट कमीशनर मार्फत मोजणी होणेसाठी दाखल केला आहे.

(२). वादींनी प्रस्तुतचा दावा निरंतर व कारक ताकिदीसाठी दाखल केला आहे. वादी यांनी गट नं.४२६ मधील दक्षिणेकडील ५०६ चौ.मी. इतके क्षेत्र दि.०९/१०/२०१४ रोजी सुरेश नारायण माळी व प्रशांत जयवंत माळी यांच्याकडुन खरेदी केले आहे. प्रतिवादी हे गट नं.४२५ मध्ये व्यवसाय करीत असुन त्यांची मिळकत वादीच्या मिळकती शेजारीच आहे. प्रतिवादीने दावा मिळक्तीमध्ये पुर्वेकडुन व दक्षिणेकडुन अतिक्रमण केले आहे. त्यामुळे दावा मिळकतीची मोजणी होणेसाठी उपअधिक्षक तालुका भुमी अभिलेख पलुस यांची नेमणुक करणेची वादींनी विनंती केली आहे.

(३). प्रतिवादी यांनी नि.२७ कडे कमीशन अर्जास म्हणणे देऊन अर्जातील कथने नाकारुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

(४). वादी यांच्या ज्येष्ठ विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला सत्य परिस्थिती न्यायालयासमोर येणेसाठी कोर्ट कमीशनर यांची नेमणुक होणे अत्यंत गरजेचे आहे. पुढे वादी यांच्या ज्येष्ठ विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, या प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीमध्ये अतिक्रमण केल्याचे नाकारलेले असल्यामुळे तसेच दावा मिळकत ही सदर गटात नाकारलेली असल्यामुळे

कोर्ट कमीशनरची नेमणुक होणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज मंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

(५). प्रतिवादी यांच्या ज्येष्ठ विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, प्रस्तुतचा दावा हा मनाईचा असुन वादी प्रस्तुत अर्जाद्वारे पुरावा उत्पन्न करत आहेत. त्यामुळे त्यांनी अर्ज खर्चासहीत नामंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

(६). प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्टयर्थ मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या **सईद मुश्ताक अहमद आणि इतर विरुध्द सईद आशिक अली खान [२०१२(१) ऑल एम.आर.८०]** आणि **श्रीमती नलुबाई नारायण शिंदे आणि इतर विरुध्द गोपिनाथ दगडु शिंदे [२०११(१) ऑल एम.आर.६०८]** या न्यायनिवाड्यांतील गुणोत्तराचा आधार घेतला आहे. प्रस्तुत दोन्ही न्यायनिवाड्यांमध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ बाबत चर्चा केलेली आहे.

(७) मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयांनी त्यांच्या विविध न्यायनिवाड्यांमध्ये असे गुणोत्तर नमुद केले आहे की, जेंव्हा दोन पक्षकारांमध्ये एकमेकालगतच्या मिळकतीच्या चतुःसिमेबाबत वाद असेल त्यावेळी कोर्ट कमीशनरची नेमणुक करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये वादींनी त्यांच्या दाव्यामध्येच दावा मिळकतीचे विस्तृत वर्णन दिलेले आहे. तसेच वादींनी प्रस्तुतचा दावा हा खरेदीखताच्या आधारावरच दाखल करुन केवळ मनाई मागितलेली आहे. प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीमध्ये वादीच्या दाव्याचे खंडन केले म्हणुन कोर्ट कमीशनरची नेमणुक करता येत नाही. वादींनी दाव्यामध्ये दावा मिळकतीचे विस्तृत वर्णन दिलेले आहे. त्यामुळे केवळ प्रतिवादींनी वादीच्या दाव्याचे खंडन केले म्हणुन कोर्ट कमीशनरची

नेमणुक केली तर सदरची नेमणुक ही उचीत ठरणार नाही. सबब प्रस्तुत कामी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळी विचारात घेण्यात येईल.

सही/xx

पलुस. (के.एस.सुर्यवंशी)

दि.१७/०९/२०१६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पलुस.